जिल्हाधिकारी कार्यालय ,गोंदिया
पुरवठा विभाग

२९५
क्र.अका/कक्ष-१/पुरवठा/ कावि/ /२०१५
जिल्हाधिकारी, यांचे कार्यालय गोंदिया
दिनांक : 30 जुलै,२०१५.

**धान ई-निविदाकरीता खालील प्रमाणे अटी व शर्ती राहतील.**

१. इ लिलावामध्ये धान खरेदीकरीता सहभागी होण्यासाठी ई-लिलाव नोंदणी फी रु.५८९/- (अक्षरी रुपये पाचशे एकोण नव्वद फक्त) Next Tender या एजन्सीकडे भरणा करून नोंदणी करणे आवश्यक राहील.व इसारा रक्कम रू.२५०००/-(अक्षरी रुपये पंचेवीस हजार फक्त ) ई-लिलाव नोंदणी करतांना मा.जिल्हाधिकारी,गोंदिया ICICI बँक शाखा गोंदिया याचे नावाने धनाकर्षाद्वारे लिलाव सुरु होण्यापुर्वी म्हणजेच दि.१०/०८/२०१५ ला ६.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. ई-लिलाव नोंदणी फी व इसारा रक्कम जमा केल्याची पावती जिल्हा पुरवठा अधिकारी,गोंदिया यांचे कडे जमा केल्यानंतरच ई- लिलावात सहभागी होता येईल.

लिलावात समाविष्ट धानाचा गोदामनिहाय तपशिल.

| अ.क्र | जिल्हा | हंगाम | गोदामाचे नाव | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | | | गोदाम | वजन क्विंटल | क्विंटलमध्ये |
| १. | **गोंदिया** | **२०१३-१४** | कृषी उत्पन्न बाजार समिती आमगाव | ३१३६.१९ | ३१३६.१९ |
| | | | असाटी गोदाम आमगाव क्रं-१ | ११९८७.९० | ११९८७.९० |
| | | | येरणे गोदाम क्रं-१ देवरी | ९८९.४४ | ९८९.४४ |
| | | | एकुण | १६११३.५३ | १६११३.५३ |

२ ई-लिलाव धारकांनी प्रत्येक गोदामातील/धान साठवणुक केलेल्या केंद्राच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या धानाकरीता स्वतंत्र दर नमुद करावे .

३. ई-लिलाव झाल्यानंतर ज्या ई-लिलाव धारकाचे दर मंजुर होतील त्या लिलावधारकास सचिव तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,गोंदिया हे ई-लिलाव स्विकृतीबाबतचे पत्र देतील.धान साठयाची विक्री जेथे आहे व जसे आहे .अशा तत्वावर करण्यात येत आहे,त्यामुळे धानाचे वजन काही अंशी कमी/अधिक होउु शकेल.

४. ईच्छुक ई-लिलाव धारकास ई-लिलाव सादर करण्यापुर्वी दर्जाबाबत खात्री करावयाची झाल्यास खरेदी केंद्रावर धान जेथे आहे त्या स्थितीत धानाचा दर्जा पाहता येईल व उपप्रादेशिक कार्यालयाचे अदिवासी विकास महामंडळ यांचे अधिनिस्थ गोदामात/खरेदी केंद्रांवर शिल्लक धान पाहता येईल.त्याकरिता त्यांनी प्रादेशिक व्यवस्थापक ,अदिवासी विकास महामंडळ , भंडारा यांचेशी संपर्क साधावा.

५. ई-लिलावधारक एका ठिकाणच्या संपुर्ण साठयाकरीता किंवा एकापेक्षा अधिक ठिकाणच्या संपुर्ण साठयाकरीता ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेवू शकेल. ई-लिलावामध्ये सादर केलेले दरामध्ये कोणत्याही प्रकारची अट समाविष्ट नसावी.

६. धान साठा असेल तेथुन धानाची उचल ,वाहतुक, हमाली ,इ. करीता संपुर्ण खर्च खरेदीदारांनेच करावयाचे आहेत.

७. लिलावधारकास सदर धानाची लिलाव स्विकृत झाल्यावर धानसाठा खरेदी ,साठवणुक व त्याची विल्हेवाट याबाबत राज्य/केंद्र शासन अथवा इतर शासकिय संस्थाचे आवश्यक परवाने प्राप्त करुन घ्यावे लागतील.त्याबाबतची संपुर्ण जवाबदारी लिलावधारकाची राहील.याबाबत राज्यशासन कोणतेही उत्तरदायित्व स्विकारणार नाही.

८. लिलावधारकाचा ई- लिलाव स्विकृत झाल्यास लिलावधारकास धानाच्या किंमतीच्या १०% सुरक्षा ठेव रक्कम लिलाव स्विकृत झाल्याचा दिनांकापासुन ३ दिवसात मा.जिल्हा पुरवठा अधिकारी,गोंदिया यांचे नावे ICICIबँक शाखा गोंदिया येथे जमा करावी लागेल व उर्वरीत९०% रक्कम लिलाव स्विकृत झाल्याच्या दिनांकापासुन १२ दिवसात जमा करावी लागेल.सदर उर्वरीत रक्कम विहीत मुदतीत जमा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम तसेच जमा करण्यात आलेली १०% रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल.तसेच शासन निर्णय दिनांक १६ मार्च २०१५ नुसार ई लिलावमंजुर झाल्यापासुन ३० दिवसांत संपुर्ण धानाची उचल करावी लागेल.ज्या साठयासाठी ज्या लिलावधारकाचा दर मंजुर होतील त्यांना तसे लेखी कळविण्यात येईल.

९. ई-लिलाव स्विकृत झाल्यानंतर त्यात कोणतेही बदल अनुज्ञेय राहणार नाही.

१०. ई-लिलाव छाननीअंती प्राप्त होणारे दरापैकी सर्वाधिक असलेले दर मंजुरीचे अधिकार जिल्हाधिकारी,गोंदिया यांना राहील.

११.धानाचे वजन करुन देण्याची जबाबदारी आदिवासी विकास महामंडळाची राहील. तदनंतर संपुर्ण येणारा खर्च उदा.हमाली,भराई इत्यादी लिलावधारकास करावा लागेल.

१४.धानावर लागु असलेले शासकीय कर,स्थानिक कर व इतर अनुषंगिक कर (उदा.विक्रीकर,आयकर,जकात कर इत्यादी) लिलावधारकास स्वत:भरावे लागतील.

१५.कोणतेही कारण न देता ई-लिलावअंशत:/पुर्णत:मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी,गोंदिया यांना राहील.

१६. ई-लिलाव प्रक्रियेत काही वाद निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी,गोंदिया यांचा निर्णय अंतिम राहील.

१७.ईच्छुक ई-लिलावधारकांना ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्याकरीता Next Tender या एजन्सीकडे रु **५८९/-** भरणा करावी लागेल.

१८.सदर धानाच्या विक्री संदर्भात ई-लिलाव प्रक्रियेत ई-लिलाव मध्ये अपसेट प्राईस पेक्षा कमी दर नमुद करता येणार नाही.सदर धानाची अपसेट प्राईस ई-लिलावातील Financial Bid मध्ये नमुद करण्यात आली आहे.

१९.सदर धानाच्या विक्रीकरीता ई-लिलाव ही प्रक्रिया वापरण्यात येईल.या प्रक्रियेत ज्यामध्ये जास्त दर प्राप्त होतील ते दर मान्य करणे अथवा नाकारणे यांचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवले आहेत.

२०. बोली नमुद करतांना रु २०/-च्या पटीमध्ये नमुद करणे अनिवार्य राहील.

जिल्हाधिकारी,
गोंदिया